महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०११९/प्र.क्र.१४/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ०७ मार्च २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस कॅम्प, मरोळ, येथील *"Overhead R.C.C. Reserve Water Tank"* याची संरचनात्मक दुरूस्ती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/कक्ष-८(१२)/ शा.१०/ १९, दिनांक ०७.०१.२०१९.

ज्ञापन.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी सशस्त्र पोलीस कॅम्प, मरोळ, येथील *"Overhead R.C.C. Reserve Water Tank"* याची संरचनात्मक दुरूस्ती करण्यासाठी रु.२५,९७,७६४/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव उक्त पत्राद्वारे सादर करण्यात आला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप विभागीय अभियंता, अंधेरी (सा.बां.) उपविभाग, अंधेरी (पश्चिम), यांनी सन २०१८-१९ च्या ई-राज्य दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले असून त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, सशस्त्र पोलीस कॅम्प, मरोळ, येथील *"Overhead R.C.C. Reserve Water Tank"* याची संरचनात्मक दुरूस्ती करण्यासाठी रु.२५,९७,७६४/- *(रुपये पंचवीस लक्ष, सत्याण्णव हजार, सातशे चौसष्ट फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;

२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करावे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१/२०१९/इमा.-२, दिनांक २९.०१.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१९४९३५०९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.03.07 19:51:48 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Abstract" च्या प्रतीसह).*
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).